## नि.क्र.२२ वर आदेश
## (दि.२२.०७.२०१९)

प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी सदरच्या प्रकरणात त्यांना लेखी जबाब सादर करण्याकरीता परवानगी मागीतली आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्या कार्यालयातुन संबंधीत दाव्याशी निगडीत असलेली माहिती प्राप्त न झाल्यामुळे ते त्यांच्या वतीने त्यांचा लेखी जबाब सादर करू शकले नाहीत. प्रतिवादी क्र.१ व ३ यांना त्यांचा लेखी जबाब सादर करण्याकरीता परवाणगी द्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

२) वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, सदरच्या अर्जावर त्यांचा तिव्र आक्षेप आहे. प्रतिवादी क्रं.१ व ३ यांनी त्यांचा लेखी जबाब मुदतीच्या आत सादर न करण्याबाबतचे कोणतेही संयुक्तिक कारण त्यांच्या अर्जात नमुद केलेले नाही. तसेच, प्रतिवादी क्रं.१ व ३ यांनी मा.सर्वोच्च न्यायालय यांनी पारीत केलेल्या न्यायनिर्णयाबाबत त्यांच्या अर्जात कथन केले आहे. परंतु, त्या न्यायनिर्णयातील गुणोत्तराच्या अनुशंगाने त्यांनी त्यांच्या अर्जात कोणतीही बाब नमुद केलेली नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३) सदर दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा आदेशात्मक व कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व ३ यांना सदर दाव्यातील समन्स हे दि.२२/०४/२०१९ व दि.२३/०४/२०१९ अनुक्रमे तामील झालेले आहे. सदरच्या दाव्यात ते दि.२१/०६/२०१९ रोजी हजर झाले व त्यांनी त्यांचा लेखी जबाब सादर करण्याकरीता सदरचा परवाणगीचा अर्ज सादर केला. प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्याविरुध्द बिनालेखी जबाब आदेश अद्याप पारीत झालेला नाही. प्रतिवादी क्र.१ व ३ यांचा अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र.१ व ३ यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादीं यांच्यात असलेला मूळ वाद हा पुराव्याच्या आधारे न्यायालयासमक्ष येईल व सदरचा दावा हा निकाली काढतांना न्यायालयास मदत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र.१ व ३ यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येतो.

अहमदपूर.
दिनांक : २२.०७.२०१९

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S.Kodgire |
| Dictated on | : | 22.07.2019 |
| Checked on | : | 22.07.2019 |
| Signed on | : | 22.07.2019 |
| Uploaded on | : | 22.07.2019 |